**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी**

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – दामू शंकर जाधव

माझे वय ७५ वर्षे व्यवसाय शेती

राहणार वाशेरे, ता.अकोले, जि.अहमदनगर.

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत–**

**१.** दिनांक ०१.०३.२०२३ रोजी माझे व आरोपीमध्ये किरकोळ बाचाबाची झाली होती. त्या व्यतिरिक्त आमचे दरम्यान काहीही घडलेले नाही. मी रागाच्या भरात आरोपीविरुध्द अकोले पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली होती. आता मला फिर्याद दाखवली. त्यावरील सही माझीच आहे. ती सही मी ओळखतो. परंतु, फिर्यादीतील मजकूर मी सांगितलेला नाही. फिर्यादीतील मजकूर मला माहित नाही. त्या फिर्यादीवरील सहीला **निशाणी पी–१९** देण्यात आली.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याने सहा. सरकारी वकील यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना साक्षीदारास उलटतपासामध्ये विचारतात त्या स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०१.०३.२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजताचे सुमारास मी माझे शेत सर्व्हे नं.३९/१ मध्ये काम करीत असताना माझे शेजारी शेत असलेले आरोपी विष्णू गंगाधर कोकाटे हे तेथे आले. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला माझ्या विहिरीच्या शेजारी असलेली तुझी बांधावरची झाडे काढून घे, सदर झाडांची पाने माझ्या विहिरीत पडून पाणी खराब होत आहे, असे समजावून सांगत असताना त्याचा त्याला राग आल्याने त्याने जमिनीवर पडलेला दगड उचलून तो दगड हातात धरून माझ्या कपाळाच्या डाव्या बाजूस, नाकावर, डाव्या हाताच्या

अंगठ्यावर व डाव्या पायाच्या मांडीवर मारून दुखापत केली आणि मला वाईट भाषेत शिवीगाळ करून "तुला या नंतर सोडणार नाही," अशी धमकी देवून तेथून निघून गेला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी घरी गेलो व घडलेला प्रकार माझी पत्नी मिराबाई दामोधर जाधव हिला सांगितला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी अकोले पोलीस ठाणे येथे येवून आरोपीविरुध्द घडलेल्या घटनेबाबत फिर्याद दाखल केली.

३. आता मला फिर्यादीतील पोर्शन मार्क 'अ' मधील मजकूर वाचून दाखविला. तो मजकूर मी पोलिसांना सांगितलेला नव्हता. पोलिसांनी तसा मजकूर का नमूद केला आहे, याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी आरोपी याचेशी न्यायालयाबाहेर तडजोड झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला शिक्षा होऊ नये, म्हणून मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.टी.एस.फापाळे यांचेतर्फे उलटतपास–**

४. नाकारला.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.03.10 15:08:05 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**

**दिनांक – ०९.०३.२०२६**